पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,

# मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, एरंडवना, पौड रोड, पुणे - ३८

## भूगोल विभाग

### शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३

### वार्षिक शैक्षणिक अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मामासाहेब मोहोळ महाविद्यालयातील भूगोल विभागामध्ये तृतीय वर्ष कला - १८ विद्यार्थी, द्वितीय वर्ष कला- ४५ विद्यार्थी, प्रथम वर्ष - १६० विद्यार्थी इत्यादी एकूण विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

महाविद्यालयामध्ये भूगोल हा विषय विशेष स्तर म्हणून अभ्यासला जात नसला, तरी देखील विद्यार्थ्यांना या विषयाबद्दल आवड निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांच्या मनामध्ये महाविद्यालयामध्ये येणे, तासिकेला बसणे इत्यादी बद्दलचे आकर्षण कमी झाल्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थी महाविद्यालयामध्ये कसे उपस्थित राहतील व पूर्वीप्रमाणे त्यांच्या मनामध्ये शिक्षणाबद्दलची आवड निर्माण करण्याकरीता भूगोल विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये अनेक कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात आले.

१. ११ जुलै २०२२ - जागतिक लोकसंख्या दिवस

२. आंतरराष्ट्रीय ओझोन दिन - १६ सप्टेंबर २०२२

३. भूगोल दिवस - १४ जानेवारी २०२३

४. BRIDGE COURSE - Geography Syllabus

१. ११ जुलै २०२२ - जागतिक लोकसंख्या दिवस

महाविद्यालयातील भूगोल विभागातर्फे जागतिक लोकसंख्या दिवस साजरा करण्यात आला. हा दिवस साजरा करण्याचा मुख्य हेतू म्हणजे विद्यार्थ्यांना या दिवसाचे महत्वक पटवून देणे, लोकसंख्या वाढीमुळे जाणवणाऱ्या समस्यांकडे लोकांचे लक्ष वेधणे, त्याविषयी जनजागृती करणे आणि या समस्येवर कश्या प्रकारे उपाय योजना करता येतील यावरील सविस्तर चर्चा करण्यासाठी भूगोल विभागाचे प्रा. डॉ. शिंदे एस.बी. यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विविध विभागाचे प्राध्यापक, विद्यार्थी सहभागी झाले.

२. आंतरराष्ट्रीय ओझोन दिन - १६ सप्टेंबर २०२२

पृथ्वीवर वाढत चाललेले कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण व त्यामुळे ओझोन थराचा होणारा ऱ्हास, प्रदूषणाचे वाढते प्रमाण, त्यामुळे त्याचा मानवी आरोग्यावर होणारा प्रतिकूल परिणाम व बदलते हवामान यावर उपाय योजना करण्यासाठी १९७८ साली कॅनडातील मॉन्ट्रीअल शहरातील परिषदेमध्ये अनेक देशांनी सहमती दर्शवली. संयुक्त राष्ट्र संघाच्या पर्यावरण कार्यक्रमानुसार (UNEP)१९९५ सालापासून १६ सप्टेंबर हा दिवस ओझोन दिवस म्हणून पाळला जातो. या अनुशंगाने महाविद्यालयामध्ये १६ सप्टेंबर या दिवशी भूगोल विभागातर्फे ओझोन दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. झावरे बी. एन., महाविद्यालयातील विविध विभागांचे प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. भूगोल विभागाचे शिंदे एस. बी. यांनी विद्यार्थ्यांना ओझोनचा ऱ्हास व त्यावरील उपाययोजना या विषयावर मार्गदर्शन केले.

३. भूगोल दिवस - १४ जानेवारी २०२३

महाविद्यालयातील भूगोल विभागातर्फे "भूगोल दिन "साजरा करण्यात आला. महर्षि डॉ. जी डी. देशपांडे यांचा जन्मदिवस १४ जानेवारी हा राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो. पृथ्वीवरील भौतिक व मानवी पर्यावरणातील रचना, क्रिया व आंतरक्रिया यांचा अभ्यास म्हणजे 'भूगोल' असे स्थूलमानाने मानले जाते. भूगोल म्हणजे मानव व पर्यावरण यांचा संबंध शोधणारे शास्त्र. १४ जानेवारी या दिवशी सूर्य धनु राशीतून मकर राशीत प्रवेश करतो यात ऊर्जेचे संक्रमण होते त्यामुळे ऋतुमध्ये बदल होण्याचा हा दिवस असतो. या दिवसाचे विशेष महत्व म्हणजे या दिवशी विविध उपक्रमाचे आयोजन केले जाते. भौगोलिक प्रदर्शन, सहल, भौगोलिक साहित्याचे प्रकाशन केले जाते. याबद्दल विदयार्थ्याच्या मनामध्ये जागरुकता निर्माण व्हावी यासाठी प्राचार्य डॉ. सातव जी. पी. यांच्या मार्गदर्शनाखाली भूगोल विभागाचे प्रा. डॉ. शिंदे एस. बी. यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी उस्फुर्तपणे सहभाग नोंदविला.